**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- ०३**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- २६/०४/२०१०

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र. ०३ शुक्रवार दि.३०/०४/२०१० रोजी दुपारी १२.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये अहमदनगर
महानगरपालिका.

**शुक्रवार दिनांक- ३०/०४/२०१० ची विषय पत्रिका.**

| विषय क्र. | विषय |
|---|---|
| १३ | अहमदनगर महानगरपालिकेचे फिरत्या दवाखान्या करिता डॉ.श्री. सुरेश विलास घोलप यांची वैद्यकीय अधिकारी या पदावर कंत्राटी करार पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात सहा महिन्याकरिता दरमहा मानधनावर तांत्रिक खंड देवुन नेमणूक करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १४ | अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीतील केडगांव देवी रोड या रस्त्यावरील देवी मंदिरासमोरील चौक सुशोभिकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| १५ | अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीतील गुलमोहर व जुना पिंपळगाव रस्ता यांना जोडणारा पारिजात चौक कॉर्नर जवळील पारिजात चौक सुशोभिकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| १६ | अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीतील चिपाडे मळा स.नं. ५१,६८,६९ मध्ये संरक्षक भिंतीसह बगीचा तयार करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| १७ | अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीतील सारसनगर कानडे मळा स.नं. १२६,१२७ मध्ये संरक्षक भिंतीसह बगीचा तयार करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |

.....२

| | |
|---|---|
| १८ | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ५१ मधील सुवर्ण जयंती पथ अंतर्गत बकर कसाब कब्रस्तान भिंगार नाल्यावरती पूल बांधणे व पुल ते कानडे मळा ते सावता चौक ते चौधरी नगर ते सोलापूर रस्त्यापर्यत रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| १९ | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ५१ मध्ये नानाजीनगर व व्हिडीओकॉन जवळील नाल्यावरती पुल बांधणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** विषय-क्रमांक १३ ते १९ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- १३ शुक्रवार दिनांक ३०/४/२०१०

ठराव क्रमांक- १३ शुक्रवार दिनांक ३०/४/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे फिरत्या दवाखान्या करिता डॉ.श्री. सुरेश विलास घोलप यांची वैद्यकीय अधिकारी या पदावर कंत्राटी करार पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात सहा महिन्याकरिता दरमहा मानधनावर तांत्रिक खंड देवुन नेमणूक करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** विषय- फिरत्या दवाखान्या करीता एक वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस. किंवा बी.ए.एम.एस. पुर्ण वेळ मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी करार पध्दतीने नेमणूकी बाबत.

**फेर सादर,**

विनंती की, अहमदनगर महानगरपालिके मधील कै.बा.दे. दवाखान्या मार्फत विविध दुर्बल घटक यांच्या कल्याणकारी योजना अंतर्गत नागरिकांना आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी फिरता दवाखाना दिनांक १ मे २००८ पासून सुरू करण्यांत आलेला आहे. सदर फिरत्या दवाखान्या करीता आस्थापना कायम सुचीवर वैद्यकीय अधिकारी नसल्याने कै.बा.दे. दवा. यांचे मागणी प्रस्तावाप्रमाणे तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी करार पध्दतीने सहा महिन्या करीता वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्दीस देवुन वैद्यकीय अधिकारी या पदावर उमेदवारांचे अर्ज मागविण्यांत आलेले होते. सदर अर्जापैकी पात्र अर्जदारांची मा.आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली मुलाखती घेवुन डॉ.श्री. घोलप यांची निवड करण्यांत आली. डॉ.श्री. घोलप यांचा तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी करार नुसार सहा महिनाचा नेमणूकीचा कालावधी दिनांक २/३/२०१० रोजी संपलेला आहे.

मा.मुख्य वैद्यकीय अधिकारी कै.बा.दे. दवा. यांचे कडील जा.क्र. ९८३ दि.२/३/१० च्या प्रस्तावाप्रमाणे "फिरत्या दवाखान्यामुळे दारिद्रय रेषेखालील व गलीच्छ वस्तीत जाउन्र आरोग्याबाबत जगजागृती व नागरिकांना आरोग्य सेवा पुरविली जाते. फिरत्या दवाखान्यासाठी वैद्यकिय अधिका-याची आवश्यक्ता भासणार आहे. डॉ.श्री. घोलप यांचे सदर नेमणूकीच्या कालावधी मध्ये फिरत्या दवाखान्याद्वारे उत्तम व चांगले प्रतीचे काम करण्यांत आलेले आहे. सदरच्या सेवेमध्ये खंड पडु नये म्हणून फिरता दवाखान्यासाठी वैद्यकीय अधिका-याची पुढील सहा महिन्याकरीता नेमणूक करणे आवश्यक आहे" असे नमुद केलेले आहे.

सदर फिरत्या दवाखान्या करिता कंत्राटी करार पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदावर दरमहा मानधनावर सहा महिन्या करीता नेमणूकी बाबत वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देवुन कार्यवाही करणे झाल्यास सदर कार्यवाहीसाठी काही कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे फिरत्या दवाखान्या मार्फत गरिब नागरिकांना आरोग्य सेवा पुरविण्यांस खंड निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३(३) मध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

५३:- नेमणूकीचा अधिकार कोणामध्ये निहीत असणे.

३.या अधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्या व्यतिरिक्त नगरपालिका अधिकारी व कर्मचारी मग कायम असोत किंवा तात्पुरते असोत यांची नेमणूक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहीत असेल.

परंतु कायम नेमणूकांच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या, त्यावेळी अमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीन असेल.

आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरती नेमणूक सहा महिन्याहून अधिक असेल अशा कोणत्याही कालावधी साठी करता येणार नाही आणि भत्ते वगळून शंभर रूपयांहून अधिक मासिक वेतन असलेल्या कोणत्याही नेमणूकीचे उक्त सहा महिन्याचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही. "असे नमुद केलेले आहे.

डॉ.श्री. घोलप यांची यापुर्वी कंत्राटी करार पध्दतीने केलेल्या नेमणूकीचा कालावधी समाप्त झालेला आहे. त्यामुळे त्यांची तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी करार पध्दतीने सहा महिन्या करीता नेमणूक करणे झाल्यास त्यांच्या सेवेमधील नेमणूकी बाबत तांत्रिक खंड पडणार आहे.

तरी मा.मुख्य वैद्यकिय अधिकारी यांचे मागणी प्रस्तावाप्रमाणे फिरत्या दवाखान्या करीता डॉ.श्री. सुरेश विलास घोलप यांची वैद्यकिय अधिकारी या पदावर कंत्राटी करार पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर तांत्रिक खंड देवुन नेमणूकी बाबत निर्णयास्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख यांना अहवाल असे. दि.०३/०४/२०१०

मा.उपायुक्त (सा.) साहेब :- Come through G.A.D.

सहा. आयुक्त :- सादर, पुन्हा जाहिरात देवुन नव्याने मुलाखती घेवुन सदरचे कंत्राटी करार पध्दतीने वैद्यकीय अधिकारी हे पद भरणेबाबत (तात्पुरत्या स्वरूप) मान्यतेस सादर. दि.७/४/१० **/अ**

मा.उपायुक्त (सा) साहेब :- "**अ**" प्रस्तावीत नुसार कार्यवाही करणे उचित राहिल मंजुरीस्तव सादर. दि.१३/०४/१०

मा.आयुक्त साहेब :- चर्चा करा दि. १६/४/२०१०

मा.आयुक्त साहेब :- चर्चा केली Standing Committee कडे पाठवा दि.१६/४/२०१०

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे फिरत्या दवाखान्या करिता डॉ.श्री. सुरेश घोलप यांची वैद्यकिय अधिकारी म्हणून तात्पुरत्या स्वरूपात सहा महिन्याकरिता दरमहा मानधनावर नेमणूक करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. लोंढे शि.बा.:- मा.सभापती साहेब काल दिनांक २९/४/२०१० रोजी घेण्यांत आलेल्या मा.स्थायी समितीची सभा ही पांच क्रमांकाची होती. आजचे स्थायी समिती सभा क्रमांक तीन आहे हे कसे ?

मा.सभापती साहेब :- काल दिनांक २९/४/२०१० रोजी घेण्यांत आलेली सभा ही बससेवेचे अटी / शर्तीस मंजूरी देणे बाबतची विशेष सभा होती ती आजच्या सभेचा अजेंडा काढल्या नंतर घेण्याचे ठरले होते.

मा.श्री. पवार बा.रे. :- फिरता दवाखाना किती दिवसापासून बंद आहे.

मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ.श्री. टेकवाणी पी.आर. :- डॉ. घोलप यांची नेमणूक दि.२/३/२०१० पासून संपलेली असल्याने फिरता दवाखाना बंद आहे.

मा.सभापती साहेबः-नागरिकांच्या सुविधेच्या दृष्टीकोणातून फिरता दवाखाना तसेच आरोग्याच्या सर्व सेवा अत्यावश्यक असल्याने यापुढे वैद्यकीय अधिकारी, लॅब टेक्नीशिअन, नर्सेस इ. चे काम समाधानकारक असल्यास त्यांचे पूनर्नेमणूक १ दिवस तांत्रिक खंड देवुन त्यांना नेमणूका देण्यांत याव्यात व प्रस्ताव अंतीम मंजूरीसाठी मा.स्थायी समिती कडे पाठविण्यात यावे.

मा.श्री. पवार बा.रे. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यांत यावा.

मा.श्री.गव्हाळे वि.ना. :- ऑफिस रिपोर्टानुसार वैद्यकीय अधिकारी म्हणून डॉ. श्री. घोलप यांची तात्पुरत्या स्वरूपात पूर्वीचे मानधनावर नेमणूक करण्यांस मंजूरी देण्यात यावी. ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा व नागरिकांच्या सुविधेच्या दृष्टीकोणातून फिरता दवाखाना तसेच आरोग्याच्या सर्व सेवा अत्यावश्यक असल्याने यापुढे वैद्यकीय अधिकारी, लॅब टेक्नीशिअन , नर्सेस इ. चे काम समाधानकारक असल्यास त्यांचे पूनर्नेमणूक १ दिवस तांत्रिक खंड देवुन त्यांना नेमणूका देण्यांत याव्यात व प्रस्ताव अंतीम मंजूरीसाठी मा.स्थायी समिती कडे पाठविण्यात यावे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे फिरत्या दवाखान्या करिता डॉ.श्री. सुरेश विलास घोलप यांची वैद्यकीय अधिकारी या पदावर कंत्राटी करार पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात सहा महिन्याकरिता पूर्वीचे दरमहा मानधनावर तांत्रिक खंड देवुन नेमणूक करण्यांस मंजूरी देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

तसेच नागरिकांच्या सुविधेच्या दृष्टीकोणातून फिरता दवाखाना तसेच आरोग्याच्या सर्व सेवा अत्यावश्यक असल्याने यापुढे वैद्यकीय अधिकारी, लॅब टेक्नीशिअन, नर्सेस इ. चे काम समाधानकारक असल्यास त्यांचे पूनर्नेमणूक १ दिवस तांत्रिक खंड देवुन त्यांना नेमणूका देण्यांत याव्यात व प्रस्ताव अंतीम मंजूरीसाठी मा.स्थायी समिती कडे पाठविण्यात यावेत.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी.

अनुमोदक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- १४ शुक्रवार दिनांक ३०/४/२०१०

ठराव क्रमांक- १४ शुक्रवार दिनांक ३०/४/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीतील केडगांव देवी रोड या रस्त्यावरील देवी मंदिरासमोरील चौक सुशोभिकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर :-** प्रति-नगरसचिव, प्रेषक शहर अभियंता जा.क्र. सा.बां.वि. १६७/१ दि.२६/४/१०

विषय :- निविदा मंजुरी बाबत.

कामाचे नांव :- केडगांव देवी रोड या रस्त्यावरील देवी मंदिरासमोरील चौक सुशोभिकरण करणे.

महोदय, उपरोक्त विषयी खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यता : मा.जिल्हाधिकारी यांची जिनिस/जिवायो ०९-१०/प्र.मा./संस-४/६३१
दि.९/३/२०१० अन्वये मंजुरी

२] प्रशासकीय मान्यता रक्कम रू.= १३,६०,३७१/-

३] तांत्रिक मान्यता रक्कम रू. = १२,७९,३२१/-

४] तांत्रिक मान्यतेची दरसुची = २००९-१०

६] निविदा (परिशिष्ट 'ब') रक्कम रू. = १२,७९,३२१=००

७] निविदा प्रसिध्दी तारीख = २१/३/२०१० दै. लोकमत

८] निविदा विक्री कालावधी = २२/३/२०१० ते ६/४/२०१० (१५ दिवस)

९] निविदा स्विकारण्याची तारीख = १३/४/२०१०

१०] निविदा उघडण्याची तारीख = २०/४/२०१०

११] कामाची मुदत = ९ महिने

११] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील खालीलप्रमाणे

| **अ.नं.** | **ठेकेदाराचे नांव** | **देकार** |
|---|---|---|
| १ | श्री. अभिजीत जोशी, अहमदनगर | १.०० % कमी |
| २ | श्री. दत्तात्रय लोंढे, अहमदनगर | २१.०० % कमी |
| ३ | श्री. संजय चितळकर, अहमदनगर | अंदाजपत्रकीय दराने |
| ४ | श्री. हर्षद शिंदे, अहमदनगर | ६.८७ % कमी |
| ५ | श्री. मोहन दराडे, अहमदनगर | २३.७९ % जादा |
| ६ | श्री. शिंदे अविनाश, अहमदनगर | १८.५० % जादा |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने श्री. दत्तात्रय लोंढे, अहमदनगर यांचा देकार सर्वात कमी म्हणजे निविदा रकमेपेक्षा २१.०० % कमी आहे. सुधारित दरसुचीनुसार (सन-२००९-१०) नूसार आलेले दर २१.४०% ने कमी आहे.

तरी कमी दराचे निविदा धारकास दराचे वाटाघाटीसाठी संबंधीत ठेकेदाराला अंतिम दर लेखी कळविणे बाबत जा.क्र. १५८/१ दि.२३/४/२०१० रोजी दराचे वाटाघाटीसाठी पत्र दिले असता, संबंधीत ठेकेदार यांनी दि.२६/४/२०१० रोजी सदरचे काम निविदा दरापेक्षा २१.९०% कमी दराने काम करणेस तयार असेल बाबत कळविले आहे. सदर प्रस्ताव मा. छाननी समिती समोर दि.२६/४/२०१० रोजी ठेवला असता सदर काम निविदा दरापेक्षा २१.९०% कमी दराने काम देणेची शिफारस करण्यात आली आहे.

संबंधित ठेकेदाराने दिलेल्या सुधारित देकारानुसार सद्यस्थिती खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | सुधारीत देकारानुसार येणारी किंमत | रू. ९,९९,१५०/- |
| २ | चालु दरसुची सा.बा. ०९-१० अनुसार कामाची अद्यावत किंमत | रू. १२,८५,८६७/- |
| ३ | ठेकेदाराची सुधारीत किंमत व कामाची अद्यावत किंमत या मधील फरक | रू.२,८६,७१७/- |
| ४ | चालु दरसुची नुसार अधिक्याची टक्केवारी (३ x १००) / २ | २२.२९% कमी |
| ५ | मा. छाननी समितीने शिफारस केलेल्या निविदा दरानुसार येणारी रक्कम | रू. ९,९९,१५०/- |
| ६ | शेरा / अभिप्राय | खालील प्रमाणे |

सदर निविदा सन २००९-२०१० दरसुचीनुसार निविदा दरापेक्षा २१.९०% कमी दराने काम करण्याची मा. छाननी समितीने केलेल्या शिफारसीनुसार सदरची निविदा मंजूरीस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे. दि. २६/४/१०

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- केडगाव देवी रस्त्यावरील देवी मंदिरासमोरील चौक सुशोभिकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- या कामाचे एस्टीमेंट दरापेक्षा कमीचे दर प्राप्त झालेले असून कमीचे दरास मंजूरी देणे विषय प्रस्ताव सभेपुढे मंजूरी साठी सादर केलेला आहे. परंतु सदरचे काम पुढे ठेकेदाराने केले नाही तर काय करणार.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- कमीचे दर मंजूर करणे यामध्ये महानगरपालिकेचा फायदा आहे होणारे कामावर देखरेख करणेचे काम प्रशासनाचे आहे काम न केल्यास प्रशासन त्या ठेकेदारावर कार्यवाही करू शकते.

मा.श्री. पवार द.ज. :- ऑफिस रिपोर्टानुसार आलेले कमीचे दरास मंजूरी देण्यात यावी.

मा.श्री. पवार बा.रे. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीतील केडगांव देवी रोड या रस्त्यावरील देवी मंदिरासमोरील चौक सुशोभिकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता तुलनात्मक दृष्टया कमीचे निविदादर धारक श्री. दत्तात्रय लोंढे, अहमदनगर यांनी वाटाघाटी अंती कमी करून दिलेल्या निविदा दरापेक्षा २१.९०% (एकवीस पूर्णांक नव्वद शतांश टक्के) कमीचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार दगडू जयवंत. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- १५ शुक्रवार दिनांक ३०/४/२०१०

ठराव क्रमांक- १५ शुक्रवार दिनांक ३०/४/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीतील गुलमोहर व जुना पिंपळगाव रस्ता यांना जोडणारा पारिजात चौक कॉर्नर जवळील पारिजात चौक सुशोभिकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर :-** प्रति-नगरसचिव, प्रेषक शहर अभियंता जा.क्र. सा.बां.वि. १६७ दि.२६/४/१०

विषय :- निविदा मंजुरी बाबत.

कामाचे नांव :- गुलमोहर व जुना पिंपळगाव रस्ता यांना जोडणारा पारिजात चौक कॉर्नर जवळील पारिजात चौक सुशोभिकरण करणे

महोदय,

उपरोक्त विषयी खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यता : मा.जिल्हाधिकारी यांची जिनिस/जिवायो ०९-१०/प्र.मा./संस-४/६३१ दि.९/३/२०१० अन्वये मंजुरी

२] प्रशासकीय मान्यता रक्कम रू.= २६,६१,७१९/-

३] तांत्रिक मान्यता रक्कम रू. = २५,०३,३२८/-

४] तांत्रिक मान्यतेची दरसुची = २००९-१०

६] निविदा (परिशिष्ट 'ब') रक्कम रू. = २५,०३,३२८=००

७] निविदा प्रसिध्दी तारीख = २१/३/२०१० दै. लोकमत

८] निविदा विक्री कालावधी = २२/३/२०१० ते ६/४/२०१० (१५ दिवस)

९] निविदा स्विकारण्याची तारीख = १३/४/२०१०

१०] निविदा उघडण्याची तारीख = २०/४/२०१०

११] कामाची मुदत = ९ महिने

११] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील खालीलप्रमाणे

| **अ.नं.** | **ठेकेदाराचे नांव** | **देकार** |
|---|---|---|
| १ | श्री. अनिल कोठारी, अहमदनगर | १५.१५ % जादा |
| २ | श्री. अन्सार शेटे, अहमदनगर | १६.०० % जादा |
| ३ | श्री. हर्षद शिंदे, अहमदनगर | १७.२० % जादा |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने श्री. अनिल कोठारी , अहमदनगर यांचा देकार सर्वात कमी म्हणजे निविदा रकमेपेक्षा १५.१५ % जादा आहे. सुधारित दरसुचीनुसार (सन-२००९-१०) नूसार आलेले दर १३.९७% ने जादा आहे.

तरी कमी दराचे निविदा धारकास दराचे वाटाघाटीसाठी संबंधीत ठेकेदाराला अंतिम दर लेखी कळविणे बाबत जा.क्र. १५८/२ दि.२३/४/२०१० रोजी दराचे वाटाघाटीसाठी पत्र दिले असता, संबंधीत ठेकेदार यांनी दि.२६/४/२०१० रोजी सदरचे काम निविदा दरापेक्षा ११.००% जादा दराने काम करणेस तयार असेल बाबत कळविले आहे. सदर प्रस्ताव मा. छाननी समिती समोर दि.२६/४/२०१० रोजी ठेवला असता सदर काम निविदा दराने काम देणेची शिफारस करण्यात आली आहे.

संबंधित ठेकेदाराने दिलेल्या सुधारित देकारानुसार सद्यस्थिती खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | सुधारीत देकारानुसार येणारी किंमत | रू. २७,७८,६९४/- |
| २ | चालु दरसुची सा.बा. ०९-१० अनुसार कामाची अद्यावत किंमत | रू. २५,२९,३४७/- |
| ३ | ठेकेदाराची सुधारीत किंमत व कामाची अद्यावत किंमत या मधील फरक | रू.२,४९,३४७/- |
| ४ | चालु दरसुची नुसार अधिक्याची टक्केवारी (३ x १००) / २ | ९.८५% जादा |
| ५ | मा. छाननी समितीने शिफारस केलेल्या निविदा दरानुसार येणारी रक्कम | रू. २५,०३,३२८/- |
| ६ | शेरा / अभिप्राय | खालील प्रमाणे |

सदर निविदा सन २००९-२०१० दरसुचीनुसार निविदा दराने देणेबाबत मा. छाननी समितीने केलेल्या शिफारसीनुसार सदरची निविदा मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे. दि. २६/४/१०

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- गुलमाहेर रोड व जुना पिंपळगाव रस्ता यांना जोडणा-या पारिजात चौक कॉर्नर जवळील पारिजात चौकाचे सुशोभिकरण करणे कामीचे निविदा दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभे मध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.शेलार नि.शि.:-सुशोभिकरणामध्ये कोण कोणती कामे करण्यांत येणार आहेत त्याची माहिती सांगावी.

शहर अभियंता श्री. मगर एन.बी. :- जुना पिंपळगाव रस्ता ८०फुटी आहे. टेलीफोन कार्यालया कडे जाणा-या गुलमोहर रोड व जुना पिंपळगाव रस्ता यांना जोडणा-या पारिजात चौकाचे सुशोभिकरणामध्ये गुलमोहर रोड व जुना पिंपळगाव रस्ता हे दोनही रस्ते जॉईन्ट होतात तेथील रस्ते ३० मीटर पर्यत रूंद करणे रस्त्यांचे डांबरीकरण करणे, विकास योजने नुसार चौकाचे सर्क्युलरायझेन करणे इत्यादी कामे चौक सुशोभिकरणा अंतर्गत करणेत येणार आहेत.

मा.सभापती साहेब :- सदरचे चौकामधील अतिक्रमणे काढण्यांत आलेली आहेत का?

मा.सौ. ढोणे मा. सु. :- प्रस्ताव मंजूर करावा जागेवर अतिक्रमणे असल्यास ती काढण्यांत यावीत.

शहर अभियंता श्री. मगर एन.बी. :- अतिक्रमणे काढून टाकण्यांत आलेली असून किरकोळ अतिक्रमणे काढणे आहेत.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- चौक सुशोभिकरण करावयाची रस्ता रूंदीची जागा आपले ताब्यात आहे का?

शहर अभियंता श्री. मगर एन.बी. :- होय आपले ताब्यात आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- केडगाव देवी मंदिरासमोरील चौक सुशोभिकरणाचे व पारिजात चौक सुशोभिकरणाची ही दोनही कामे बहुतेक सारखी असून या कामाचे ठेकेदार यांनी जादाचे दर दिलेले आहेत.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- सदरचे निविदा धारक यांना वाटाघाटीसाठी बोलावण्यांत आले होते त्यांना दर कमी करणेस सांगितले होते. परंतु त्यांनी दर कमी करणे अमान्य केले होते.

मा.श्री. लोंढे शि.बा. :- सदर कामाचे एस्टीमेंट प्रमाणेचे दरास मंजूरी देण्यात यावी.

मा.श्री. पवार बा.रे. :- वाटाघाटीचे वेळी संबंधीत ठेकेदार यांना सदरचे काम एस्टीमेंट दराने करणे बाबत माहिती होती का? त्यांनी पत्र वैगेरे दिले आहे का ?

मा.उपायुक्त (सा. श्री. हांगे साहेब:- प्रशासनाने शिफारस करून प्रस्ताव मंजूरीसाठी सादर केलेला आहे.

शहर अभियंता श्री. मगर एन.बी. :- सदर कामाचे कमीचे निविदादर धारक श्री. अनिल कोठारी यांनी ११% जादाचे दराने काम करणेस तयार असेलबाबत दिनांक २३/४/२०१०रोजी दिलेले आहे .

मा.श्री. बारस्कर पो.ज.:- निविदा दरापेक्षा ५% जादाचे दरात काम करून घेण्यास मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- निविदा दरापेक्षा ५% जादाचे दरात काम करण्यांस ठेकेदार तयार होईल का ?

मा.उपायुक्त (कर) डॉ.श्री. जावळे साहेब :- प्रशासनाने सदर कामाचे एस्टीमेंट दरामध्ये काम करून घेण्यास मंजूरी देणे विषयी शिफारस केलेली आहे. त्याप्रमाणेचे दरास मा.सभेने मंजूरी द्यावी.

मा.श्री. पवार बा.रे.:- ठेकेदार काम परवडत नाही असे म्हणतात.

मा.श्री. बारस्कर पो.ज.:- सन २००९-२०१० चे निविदा दरापेक्षा ५% जादाचे दरात काम करून घेण्यास मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. गव्हाळे वि.ना. :- ५ % जादाचे दरास मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- सदरचे काम सन २००९-२०१० चे सुधारित दरसुची दरापेक्षा ५% जादाचे दराने देण्यास मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीतील गुलमोहर व जुना पिंपळगाव रस्ता यांना जोडणारा पारिजात चौक कॉर्नर जवळील पारिजात चौक सुशोभिकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्टावर सभे मध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

तुलनात्मक दृष्टया कमीचे निविदा दर धारक श्री. अनिल कोठारी, अहमदनगर यांना सदरचे काम सन २००९-२०१० सालचे सुधारित दरसुची पेक्षा ५% (पांच टक्के) जादाचे दराने देण्यास हि सभा मंजूरी देत आहे खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- १६ शुक्रवार दिनांक ३०/४/२०१०

ठराव क्रमांक- १६ शुक्रवार दिनांक ३०/४/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीतील चिपाडे मळा स.नं. ५१,६८,६९ मध्ये संरक्षक भिंतीसह बगीचा तयार करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर :-** प्रति-नगरसचिव, प्रेषक शहर अभियंता जा.क्र. सा.बां.वि. १६७/३ दि.२६/४/१०

विषय :- निविदा मंजुरी बाबत.

कामाचे नांव :- चिपाडे मळा स.नं. ५१,६८,६९ मध्ये संरक्षक भिंतीसह बगीचा तयार करणे

महोदय,

उपरोक्त विषयी खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यता : मा.जिल्हाधिकारी यांची जिनिस/जिवायो ०९-१०/प्र.मा./संस-४/६३१ दि.९/३/२०१० अन्वये मंजुरी

२] प्रशासकीय मान्यता रक्कम रू.= ३०,०७,३३७/-

३] तांत्रिक मान्यता रक्कम रू. = २८,६०,४१२/-

४] तांत्रिक मान्यतेची दरसुची = २००९-१०

६] निविदा (परिशिष्ट 'ब') रक्कम रू. = २८,६०,४१२ =००

७] निविदा प्रसिध्दी तारीख = २१/३/२०१० दै. लोकमत

८] निविदा विक्री कालावधी = २२/३/२०१० ते ६/४/२०१० (१५ दिवस)

९] निविदा स्विकारण्याची तारीख = १३/४/२०१०

१०] निविदा उघडण्याची तारीख = २०/४/२०१०

११] कामाची मुदत = ९ महिने

११] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | देकार |
|---|---|---|
| १ | श्री. अजय पोटे, अहमदनगर | १६.५० % जादा |
| २ | श्री. हर्षद शिंदे, अहमदनगर | १७.०० % जादा |
| ३ | श्री. अन्सार शेटे, अहमदनगर | १५.२७ % जादा |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने श्री. अन्सार शेटे, अहमदनगर यांचा देकार सर्वात कमी म्हणजे निविदा रकमेपेक्षा १५.२७ % जादा आहे. सुधारित दरसुचीनुसार (सन-२००९-१०) नूसार आलेले दर १३.७९% ने जादा आहे.

तरी कमी दराचे निविदा धारकास दराचे वाटाघाटीसाठी संबंधीत ठेकेदाराला अंतिम दर लेखी कळविणे बाबत जा.क्र. १५८/४ दि.२३/४/२०१० रोजी दराचे वाटाघाटीसाठी पत्र दिले असता, संबंधीत ठेकेदार यांनी दि.२६/४/२०१० रोजी सदरचे काम निविदा दरापेक्षा ११.००% जादा दराने काम करणेस तयार असेल बाबत कळविले आहे. सदर प्रस्ताव मा. छाननी समिती समोर दि.२६/४/२०१० रोजी ठेवला असता सदर काम निविदा दराने काम देणेची शिफारस करण्यात आली आहे.

संबंधित ठेकेदाराने दिलेल्या सुधारित देकारानुसार सद्यस्थिती खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | सुधारीत देकारानुसार येणारी किंमत | रू. ३१,७५,०५७/- |
| २ | चालु दरसुची सा.बा. ०९-१० अनुसार कामाची अद्यावत किंमत | रू. २८,९७,६०६/- |
| ३ | ठेकेदाराची सुधारीत किंमत व कामाची अद्यावत किंमत यामधील फरक | रू.२,७७,४५१/- |
| ४ | चालु दरसुची नुसार अधिक्याची टक्केवारी (३ x १००)<br>२ | ९.५७% जादा |
| ५ | मा.छाननी समितीने शिफारस केलेल्या निविदा दरानुसार येणारी रक्कम | रू. २८,६०,४१२/- |
| ६ | शेरा / अभिप्राय | खालील प्रमाणे |

सदर निविदा सन २००९-२०१० दरसुचीनुसार निविदा दराने देणेबाबत मा. छाननी समितीने केलेल्या शिफारसीनुसार सदरची निविदा मा.स्थायी समिती समोर निर्णयास्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे. दि. २६/४/१०

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- चिपाडे मळा सर्व्हे नं.५१,६८,६९ मध्ये संरक्षक भिंतीसह बगीचा तयार करणे कामी आलेल्या निविदा दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभे मध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- एस्टीमेंट दरापेक्षा ५% जादाचे दर मंजूर करावे.

मा.सभापती साहेब :- वाटाघाटी अंती कमी करून दिलेले दराबाबत सदर कामाचे निविदाकार यांनी पत्र दिलेले आहे का?

शहर अभियंता श्री. मगर एन.बी. :- निविदा दरापेक्षा ११% जादाचे दराने काम करणेस तयार असलेबाबत कमीचे निविदाकार श्री. अन्सार शेटे, अहमदनगर यांनी पत्र दिलेले आहे. प्रशासाने सदरचे काम निविदा दराने करणेस मंजूरी मिळणे करिता प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.श्री. गव्हाळे वि.ना. :- ५% जादाचे दराने काम करणेस देण्यास मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- सदरचे काम निविदा दरापेक्षा ५% जादाचे दराने संबंधीत ठेकेदारास करणेस देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात यावी.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीतील चिपाडे मळा स.नं. ५१,६८,६९ मध्ये संरक्षक भिंतीसह बगीचा तयार करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्टावर सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

तुलनात्मक दृष्टया कमीचे निविदा दरधारक श्री. अन्सार शेटे, अहमदनगर यांना सदरचे काम सन २००९-२०१० सालचे सुधारित दरसुची पेक्षा ५% (पाच टक्के) जादाचे दराने देण्यास हि सभा मंजूरी देत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

सही /-

अनुमोदक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना. सही

सभापती ,

ठराव सर्वानुमते मंजूर.

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०३

विषय क्रमांक- १७ शुक्रवार दिनांक ३०/४/२०१०

ठराव क्रमांक- १७ शुक्रवार दिनांक ३०/४/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीतील सारसनगर कानडे मळा स.नं. १२६,१२७ मध्ये संरक्षक भिंतीसह बगीचा तयार करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर :-** प्रति-नगरसचिव, प्रेषक शहर अभियंता जा.क्र. सा.बां.वि. १६७/४ दि.२६/४/१०

विषय :- निविदा मंजुरी बाबत.

कामाचे नांव :- सारसनगर कानडे मळा स.नं. १२६,१२७ मध्ये संरक्षक भिंतीसह बगीचा तयार करणे

महोदय,

उपरोक्त विषयी खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यता : मा.जिल्हाधिकारी यांची जिनिस/जिवायो ०९-१०/प्र.मा./संस-४/६३१ दि.९/३/२०१० अन्वये मंजुरी

२] प्रशासकीय मान्यता रक्कम रू.= २७,४८,२१२/-

३] तांत्रिक मान्यता रक्कम रू. = २५,९६,८७९/-

४] तांत्रिक मान्यतेची दरसुची = २००९-१०

६] निविदा (परिशिष्ट 'ब') रक्कम रू. = २५,९६,८७९ =००

७] निविदा प्रसिध्दी तारीख = २१/३/२०१० दै. लोकमत

८] निविदा विक्री कालावधी = २२/३/२०१० ते ६/४/२०१० (१५ दिवस)

९] निविदा स्विकारण्याची तारीख = १३/४/२०१०

१०] निविदा उघडण्याची तारीख = २०/४/२०१०

११] कामाची मुदत = ९ महिने

११] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | देकार |
|---|---|---|
| १ | श्री. अजय पोटे, अहमदनगर | १५.३२ % जादा |
| २ | श्री. हर्षद शिंदे, अहमदनगर | १७.४० % जादा |
| ३ | श्री. अन्सार शेटे, अहमदनगर | १६.३० % जादा |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने श्री. अजय पोटे,अहमदनगर यांचा देकार सर्वात कमी म्हणजे निविदा रकमेपेक्षा १५.३२% जादा आहे. सुधारित दरसुचीनुसार (सन-२००९-१०) नूसार आलेले दर १३.२२% ने जादा आहे.

तरी कमी दराचे निविदा धारकास दराचे वाटाघाटीसाठी संबंधीत ठेकेदाराला अंतिम दर लेखी कळविणे बाबत जा.क्र. १५८/५ दि.२३/४/२०१० रोजी दराचे वाटाघाटीसाठी पत्र दिले असता, संबंधीत ठेकेदार यांनी दि.२६/४/२०१० रोजी सदरचे काम निविदा दरापेक्षा ११.८३% जादा दराने काम करणेस तयार असेल बाबत कळविले आहे. सदर प्रस्ताव मा. छाननी समिती समोर दि.२६/४/२०१० रोजी ठेवला असता सदर काम निविदा दराने काम देणेची शिफारस करण्यात आली आहे.

संबंधित ठेकेदाराने दिलेल्या सुधारित देकारानुसार सद्यस्थिती खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | सुधारीत देकारानुसार येणारी किंमत | रू. २९,०४,०९०/- |
| २ | चालु दरसुची सा.बा. ०९-१० अनुसार कामाची अद्यावत किंमत | रू. २६,४५,०१९/- |
| ३ | ठेकेदाराची सुधारीत किंमत व कामाची अद्यावत किंमत यामधील फरक | रू.२,५९,०७१/- |
| ४ | चालु दरसुची नुसार अधिक्याची टक्केवारी (३ x १००)<br>२ | ९.७९ % जादा |
| ५ | मा.छाननी समितीने शिफारस केलेल्या निविदा दरानुसार येणारी रक्कम | रू. २५,९६,८७९/- |
| ६ | शेरा / अभिप्राय | खालील प्रमाणे |

सदर निविदा सन २००९-२०१० दरसुचीनुसार निविदा दराने देणेबाबत मा. छाननी समितीने केलेल्या शिफारसीनुसार सदरची निविदा मा.स्थायी समिती समोर निर्णयास्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे. दि. २६/४/१०

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- सारसनगर कानडे मळा स.नं. १२६,१२७ मध्ये संरक्षक भिंतीसह बगीचा तयार करणे कामीचे निविदा दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभे मध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.बारस्कर पो.ज.:-निविदा दरापेक्षा ५%जादाचे दराने काम करण्यांस देण्यास मंजूरी देण्यात यावी.

मा.श्री. गव्हाळे वि.ना. :- ५% जादाचे दराने काम करणेस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- तुलनात्मक दृष्टया कमीचे निविदा दर धारक यांना निविदा रकमेपेक्षा ५% जादाचे दराने देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीतील सारसनगर कानडे मळा स.नं.१२६,१२७ मध्ये संरक्षक भिंतीसह बगीचा तयार करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्टावर सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढिल प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

तुलनात्मक दृष्टया कमीचे निविदा दरधारक श्री.अजय पोटे, अहमदनगर यांना सदरचे काम सन २००९-२०१० सालचे सुधारित दरसुची पेक्षा ५% (पाच टक्के) जादाचे दराने देण्यास ही सभा मंजूरी देत आहे खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना. सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- १८ शुक्रवार दिनांक ३०/४/२०१०

ठराव क्रमांक- १८ शुक्रवार दिनांक ३०/४/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ५१ मधील सुवर्ण जयंती पथ अंतर्गत बकर कसाब कब्रस्तान भिंगार नाल्यावरती पूल बांधणे व पुल ते कानडे मळा ते सावता चौक ते चौधरी नगर ते सोलापूर रस्त्यापर्यत रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर :-** प्रति-नगरसचिव, प्रेषक शहर अभियंता जा.क्र. सा.बां.वि. १६७/५ दि.२६/४/१०

विषय :- निविदा मंजुरी बाबत.

कामाचे नांव :- सुवर्ण जयंती पथ अंतर्गत प्रभाग क्रमांक ५१ मध्ये बकर कसाब कब्रस्तान भिंगार नाल्यावरती पूल बांधणे व पुल ते कानडे मळा ते सावता चौक ते चौधरी नगर ते सोलापूर रस्त्यापर्यत रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.

महोदय,

उपरोक्त विषयी खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यता : मा. महासभा यांची ठराव क्र.४० दि.२१/०१/२०१० अन्वये मंजूरी

२] प्रशासकीय मान्यता रक्कम रू.= ७८,२५,७८३/-

३] तांत्रिक मान्यता रक्कम रू. = ७३,२५,७८३/-

४] तांत्रिक मान्यतेची दरसुची = २००९-२०१०

६] निविदा (परिशिष्ट 'ब') रक्कम रू. = ७३,०३,५२८ =००

७] निविदा प्रसिध्दी तारीख = २१/१/२०१० दै. केसरी

८] निविदा विक्री कालावधी = २२/२/२०१० ते १८/३/२०१० (२५ दिवस)

९] निविदा स्विकारण्याची तारीख = २६/३/२०१०

१०] निविदा उघडण्याची तारीख = ३१/३/२०१०

११] कामाची मुदत = १२ महिने

११] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | देकार |
|---|---|---|
| १ | मे. बेस्ट कंन्स्ट्र. , अहमदनगर | २०.०० % जादा |
| २ | मे. केटी कंन्स्ट्र., अहमदनगर | १७.०० % जादा |
| ३ | मे.ए.सी. कोठारी, अहमदनगर | १५.१५ % जादा |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने मे. ए.सी. कोठारी ,अहमदनगर यांचा देकार सर्वात कमी म्हणजे निविदा रकमेपेक्षा १५.१५% जादा आहे. सुधारित दरसुचीनुसार (सन-२००९-१०) नूसार आलेले दर १२.९०% ने जादा आहे.

तरी कमी दराचे निविदा धारकास दराचे वाटाघाटीसाठी संबंधीत ठेकेदाराला अंतिम दर लेखी कळविणे बाबत जा.क्र. २८ दि.५/४/२०१० रोजी दराचे वाटाघाटीसाठी पत्र दिले असता, संबंधीत ठेकेदार यांनी दि.२६/४/२०१० रोजी सदरचे काम निविदा दरापेक्षा १२.००% जादा दराने काम करणेस तयार असेल बाबत कळविले आहे. सदर प्रस्ताव मा. छाननी समिती समोर दि.२६/४/२०१० रोजी ठेवला असता सदर काम निविदा दराने काम देणेची शिफारस करण्यात आली आहे.

संबंधित ठेकेदाराने दिलेल्या सुधारित देकारानुसार सद्यस्थिती खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | सुधारीत देकारानुसार येणारी किंमत | रू. ८१,७९,९५१/- |
| २ | चालु दरसुची सा.बा. ०९-१० अनुसार कामाची अद्यावत किंमत | रू. ७४,४९,११९/- |
| ३ | ठेकेदाराची सुधारीत किंमत व कामाची अद्यावत किंमत यामधील फरक | रू.७,३०,८३२/- |
| ४ | चालु दरसुची नुसार अधिक्याची टक्केवारी (३ x १००)<br>२ | ९.८१ % जादा |
| ५ | मा.छाननी समितीने शिफारस केलेल्या निविदा दरानुसार येणारी रक्कम | रू. ७३,०३,५२८/- |
| ६ | शेरा / अभिप्राय | खालील प्रमाणे |

सदर निविदा सन २००९-२०१० दरसुचीनुसार निविदा दराने देणेबाबत मा. छाननी समितीने केलेल्या शिफारसीनुसार सदरची निविदा मा.स्थायी समिती समोर निर्णयास्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे. दि. २६/४/१०

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्र. ५१ मधील सुवर्ण जयंती पथ अंतर्गत बकर कसाब कब्रस्तान भिंगार नाल्यावर पुल बांधणे व पुल ते कानडे मळा ते सावता चौक ते चौधरी नगर ते सोलापूर रस्त्यापर्यत रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे कामीचे निविदा दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभे मध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. लोंढे शि.बा.:- एस्टीमेंट दराने काम करण्यांस देण्यास मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. पवार बा.रे.:- एस्टीमेंट दराने काम करण्यांस निविदाकार तयार होणार नाही. निविदा कुणी भरत नाहीत.

मा.उपायुक्त (कर) डॉ.श्री. जावळे साहेब :- मा. छाननी समितीचे शिफारसी नुसार सन २००९-२०१०चे दरसुची नुसार निविदा दराने काम देणे बाबत प्रशासनाने शिफारस केलेली आहे. त्याप्रमाणे मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. गव्हाळे वि.ना. :- विषय क्रमांक १८ व १९ चे पुलांचे कामे एस्टीमेंट दरापेक्षा ९% जादाचे दराने देण्यास मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. पवार बा.रे. :- विषय क्रमांक १८ व १९ चे पुलांचे कामे एस्टीमेंट दरापेक्षा ९% जादाचे दराने देण्यास मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक १८ व १९ चे पुलांची कामे तुलनात्मक दृष्टया कमीचे निविदादर धारक यांना निविदा रकमेपेक्षा ९% जादाचे दराने करणेस देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ५१ मधील सुवर्ण जयंती पथ अंतर्गत बकर कसाब कब्रस्तान भिंगार नाल्यावरती पूल बांधणे व पुल ते कानडे मळा ते सावता चौक ते चौधरी नगर ते सोलापूर रस्त्यापर्यत रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

--**--

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ५१ मधील सुवर्ण जयंती पथ अंतर्गत बकर कसाब कब्रस्तान भिंगार नाल्यावरती पूल बांधणे व पुल ते कानडे मळा ते सावता चौक ते चौधरी नगर ते सोलापूर रस्त्यापर्यत रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्टावर सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढिलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

तुलनात्मक दृष्टया कमीचे निविदा दरधारक श्री. मे.ए.सी. कोठारी अहमदनगर यांना सदरचे काम सन २००९-२०१० सालचे सुधारित दरसुची पेक्षा ९% (नउ टक्के) जादाचे दराने देण्यास ही सभा मंजूरी देत आहे खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- १९ शुक्रवार दिनांक ३०/४/२०१०

ठराव क्रमांक- १९ शुक्रवार दिनांक ३०/४/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ५१ मध्ये नानाजीनगर व व्हिडीओकॉन जवळील नाल्यावरती पुल बांधणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर :-** प्रति-नगरसचिव, प्रेषक शहर अभियंता जा.क्र. सा.बां.वि. १६७/६ दि.२६/४/१०

विषय :- निविदा मंजुरी बाबत.

कामाचे नांव :- प्रभा क्रमांक ५१ मध्ये नानाजीनगर व व्हिडीओकॉन जवळील नाल्यावरती पुल बांधणे

महोदय,

उपरोक्त विषयी खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यता : मा. स्थायी समिती सभा ठराव क्र.५९ दि.३/११/२००९ अन्वये मंजूरी

२] प्रशासकीय मान्यता रक्कम रू.= ६०,००,०००/-

३] तांत्रिक मान्यता रक्कम रू. = ५९,९९,१३७/-

४] तांत्रिक मान्यतेची दरसुची = २००९-२०१०

६] निविदा (परिशिष्ट 'ब') रक्कम रू. = ५५,५४,७५६ =००

७] निविदा प्रसिध्दी तारीख = दिनांक ९/३/२०१० दै. सामना

८] निविदा विक्री कालावधी = ९/३/२०१० ते १७/३/२०१० (९ दिवस)

९] निविदा स्विकारण्याची तारीख = २२/३/२०१०

१०] निविदा उघडण्याची तारीख = ३१/३/२०१०

११] कामाची मुदत = ९ महिने

११] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील खालीलप्रमाणे

[प्रथम प्राप्त निविदा प्राप्त-३ व दरामुळे रद्द, व्दितीय निविदा प्राप्त २ व दरामुळे रद्द, तृतीय निविदा प्राप्त १ व तपशिल खालीलप्रमाणे ]

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | देकार |
|---|---|---|
| १ | मे. ए. सी. शेख, अहमदनगर | ३५.०० % जादा |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने मे. ए.सी. शेख,अहमदनगर यांचा देकार सर्वात कमी म्हणजे निविदा रकमेपेक्षा ३५.००% जादा आहे. सुधारित दरसुचीनुसार (सन-२००९-१०) नूसार आलेले दर ३१.६४% ने जादा आहे.

तरी कमी दराचे निविदा धारकास दराचे वाटाघाटीसाठी संबंधीत ठेकेदाराला अंतिम दर लेखी कळविणे बाबत जा.क्र. २८ दि.५/४/२०१० रोजी दराचे वाटाघाटीसाठी पत्र दिले असता, संबंधीत ठेकेदार यांनी दि.२६/४/२०१० रोजी सदरचे काम निविदा दरापेक्षा १२.५०% जादा दराने काम करणेस तयार असेल बाबत कळविले आहे. सदर प्रस्ताव मा. छाननी समिती समोर दि.२६/४/२०१० रोजी ठेवला असता सदर काम निविदा दराने काम देणेची शिफारस करण्यात आली आहे.

संबंधित ठेकेदाराने दिलेल्या सुधारित  देकारानुसार सद्यस्थिती खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | सुधारीत देकारानुसार येणारी किंमत | रू. ६२,४९,१००/- |
| २ | चालु दरसुची सा.बा. ०९-१० अनुसार कामाची अद्यावत किंमत | रू. ५६,९६,६६३/- |
| ३ | ठेकेदाराची सुधारीत किंमत व कामाची अद्यावत किंमत यामधील फरक | रू.५,५२,४३७/- |
| ४ | चालु दरसुची नुसार अधिक्याची टक्केवारी (३ x १००)<br>२ | ९.६९ % जादा |
| ५ | मा.छाननी समितीने शिफारस केलेल्या निविदा दरानुसार येणारी रक्कम | रू. ५५,५४,७५६/- |
| ६ | शेरा / अभिप्राय | खालील प्रमाणे |

सदर निविदा सन २००९-२०१० दरसुचीनुसार निविदा दराने देणेबाबत मा. छाननी समितीने केलेल्या शिफारसीनुसार सदरची निविदा मा.स्थायी समिती समोर निर्णयास्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे. दि. २६/४/१०

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ५१ मध्ये नानाजीनगर व व्हिडीओकॉन जवळील नाल्यावरती पुल पुल बांधणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्टावर  सभेमध्ये  झालेल्या चर्चेनुसार पुढिलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

तुलनात्मक दृष्टया कमीचे निविदा दरधारक श्री. मे.ए.सी. शेख ,अहमदनगर  यांना सदरचे काम सन २००९-२०१० सालचे सुधारित  दरसुची पेक्षा ९% (नऊ टक्के) जादाचे दराने देण्यास ही सभा  मंजूरी  देत आहे खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना.   सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी.   सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका